# क्रेडाई, घोडावत इन्स्टिट्यूटमध्ये सामंजस्य करार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : कॉन्फिडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया (क्रेडाई) ही ट्रेड असोसिएशन व्यावसायिक संस्था राष्ट्रीय, राज्यस्तरावर रिअल इस्टेट डेव्हलपर्सचे काम पाहते. महाराष्ट्रात सध्या ४० शहरांत ही संस्था काम करते. यामध्ये ४८०० सदस्य रिअल इस्टेट डेव्हलपर्स म्हणून कार्यरत आहेत. यावर्षी संस्थेची पश्चिम महाराष्ट्रातील पहिलीच विभागीय भेट संजय घोडावत इन्स्टिट्यूटमध्ये घेतली. यात पश्चिम महाराष्ट्रातील १४ शहरांतील कोल्हापूर, सांगली, सातारा, चिपळूण, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, इचलकरंजी, कराड, सावंतवाडी, नगर, बारामती, सोलापूर, पंढरपूर येथून सदस्य उपस्थित होते. भेटीदरम्यान घोडावत इन्स्टिट्यूट, क्रेडाईत सामंजस्य करार झाला.




कोल्हापूर : क्रेडाई, घोडावत इन्स्टिट्यूटमध्ये सामंजस्य करार करताना मान्यवर.

या करारामार्फत कन्सल्टन्सी, प्लेसमेंट, टेक्नॉलॉजी ट्रान्स्फरवर क्रेडाई व एसजीआय या संस्था प्रामुख्याने भर देतील. संस्थाध्यक्ष संजय घोडावत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय क्रेडाई इंडियाचे उपाध्यक्ष सतीश मगर, क्रेडाईचे महाराष्ट्र विभागाचे अध्यक्ष प्रशांत सरोदे, उपाध्यक्ष राजीव पारीख, सुनील भायवंग, पुणे विभागाचे अध्यक्ष शांतिलाल कटारिया, कोल्हापूरचे अध्यक्ष महेश यादव, घोडावत इन्स्टिट्यूटचे विनायक भोसले, डॉ. व्ही. ए. रायकर प्रमुख उपस्थित होते.

या भेटीत अनेक विषयांवर चर्चा झाली. आपल्या शहरात विकासाच्या संकल्पना काय असू शकतील, तसेच शासनाचे विविध जीआर, धंद्यातील चढउतार, टॅक्सेशन, सरकारी योजना नियम, नियमावली या संदर्भातील चर्चा सदस्यांपर्यंत पोहोचवण्याबाबत चर्चा झाली.

श्री. घोडावत यांनी अशा पद्धतीच्या विभागीय भेटी इन्स्टिट्यूटमध्ये घेऊ. त्यासाठी लागेल ती मदत देण्याची ग्वाही दिली. श्री. भोसले, डॉ. रायकर यांनी या करारांतर्गत कन्सल्टन्सी, प्लेसमेंट, टेक्नॉलॉजी ट्रान्स्फरवर तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला. ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर अमित सरकार, समन्वयक मकरंद जोशी, अभिजित लाटकर यांनी परिश्रम घेतले.